# कुपोषण बुद्धीचं !

**डॉ. मनोज भाटवडेकर**

**केतनची समस्या अभ्यास न करणाऱ्या इतर मुलांपेक्षा वेगळीच होती. इथे होत होतं ते त्याच्या बुद्धीचं कुपोषण !**

''आम्ही मध्यंतरी एका इंग्रजी मासिकातला लेख वाचला - हायपरॲक्टिव्ह मुलांबद्दल. चंचल, उतावळ्या मुलांची लक्षणं, त्यावरचे उपाय याबद्दल त्यात माहिती दिली होती. आमच्या केतनमध्ये ही सगळीच्या सगळी लक्षणं जशीच्या तशी दिसताहेत. त्या लेखात त्यांनी असं लिहिलं होतं की लगेचच उपाययोजना करायला पाहिजेत. वेळ घालवू नये म्हणून आम्ही लगेच आलो तेव्हा तुम्ही ताबडतोब काय ती औषध चालू करा- काय चालू करताय? रिटॅलिन की पेमोलिन? की आधी त्याचा ई.ई.जी. करून घेऊ?'' केतनची आई कुठल्याशा इंग्रजी मासिकातला लेख वाचून आपल्या मुलाच्या समस्येचं निदान करून मोकळी झाली होती. ''तुम्ही फक्त कागदावर औषधाचं नाव लिहून खाली सही करा. तुम्हाला निवड करायला सोपं जावं म्हणून दोन औषधांची नावंही सांगितली. आमच्याकडे डॉक्टरची डिग्री नाही, तुमच्याकडे आहे एवढाच काय तो तुमच्या-आमच्यातला फरक.'' हा एकूण गर्भितार्थ ! माझा एक डॉक्टरमित्र अशा मंडळींना 'सुशिक्षित अडाणी' म्हणतो. अशा मंडळींचं मोठं वैशिष्ट्य म्हणजे काही ठाम पूर्वग्रह मनात धरूनच ती डॉक्टरांकडे आलेली असतात. डॉक्टर त्यांच्या मताशी सहमत झाले तर ते चांगले, नाही झाले तर ''त्यांना काही कळलंच नाही. त्यांचं ॲटिटयूड जरा प्रोफेशनलच आहे'' वगैरे वगैरे मल्लिनाथी तयार असते.

'केतनच्या समस्येचं निदान आपण उलटीकडून न करता सरळ पद्धतीने करू या. म्हणजे आधी लक्षणांची चौकट तयार करून मग त्यात त्याला कोंबून बसवण्यापेक्षा त्याच्या वर्तनात कुठली लक्षणं दिसताहेत, ती कसली लक्षणं आहेत, कशामुळे आहेत हे ठरवून मग त्यावर उपाय शोधून काढू. वैद्यकशास्त्रात हिस्टरी किंवा माहितीला सर्वांत जास्त महत्त्व असतं. तेव्हा आधी मला केतनबद्दल सगळी माहिती सांगा.'

''त्याचं अगदी टिपिकल आहे हो सगळं. एका जागी स्थिर बसायचं नाही. अभ्यास कसातरी उरकायचा. सांगितलेलं ऐकायचं नाही. उद्धटासारखं वागायचं. जाम कश्शाला घाबरायचं नाही. आपलं ते खरं करायचं. आता तो तिसरीत आहे. म्हणजे काही अगदी लहान नाही. त्याला हाताळायचं म्हणजे दिवसेंदिवस कठीण होत चाललंय.''

'बरं, त्याच्या जन्माच्या वेळी काही अडचण, आजार वगैरे काही?'

''छे, काही नाही. नॉर्मल होतं सगळं. पुढचंही सगळं वेळेवर झालं. म्हणजे– चालणं, बोलणं वगैरे. बोलायला तर तो लवकरच लागला. लहानपणी छान होता. शाळेत घातल्यापासून त्याचं हे थैमान चालू झालंय. शाळेत एवढे तास बसायचं म्हणजे त्याला शिक्षाच वाटते. त्याच्या बाई पण हैराण झाल्यायत. त्या सांगत असतात– जास्तीत जास्त दहा मिनिटं त्याचं लक्ष एका जागी टिकतं. कुठलाही नवीन विषय शिकवताना आधी त्याला त्यात रस असतो. पण थोडा वेळ झाला की संपलं. मग तो इतर मुलांच्या खोड्या काढतो, आवाज करतो, इतरांचं लक्ष स्वत:कडे वेधून घेतो, रोज बाईंच्या चिठ्ठ्या येत असतात– येऊन भेटा. शाळेत गेले की मुलं तक्रारी सांगत असतात. आज केतनने अमुक केलं, आज केतनने तमुक केलं. मी अगदी कंटाळलेय आता.''

'अभ्यास त्याला आवडत नाही का?'

''कोण जाणे काय ते विचारलं तर उत्तरं येत असतात. पण देईलच असा भरवसा नाही. कधी कधी मख्खासारखा चेहरा करून उभा राहतो. आपणहून काही अभ्यासाला बसणार नाही. शाळेतून घरी येतो दुपारी तीनपर्यंत. रात्री दहा वाजेपर्यंत वेळ काढत राहतो. अगदी झोपायची वेळ झाली की मग हा डिक्लेअर करतो– माझं होमवर्क राहिलंय. मग अर्ध्या तासात कसतरी करून मोकळा होतो. की दुसऱ्या दिवशी वहीत रिमार्क्स येतात – अक्षर नीट काढा, मोठी उत्तरं व्यवस्थित लिहा वगैरे वगैरे. मग मला बाईंचं सांगणं– तुम्ही जरा त्याच्याकडून करून घ्या. घ्यायला मला काही वाटत नाही हो. पण त्याने दाद द्यायला हवी ना? मी अभ्यास घ्यायला लागले की मारामाऱ्याच होतात आमच्या. एकदा वाचलेलं पुन्हा वाच, पुन्हा लिही म्हटलं की संपलंच– तो वस्तूंची फेकाफेकच सुरू करतो.''

'मार्क कसे असतात?'

''कसे असणार असं लिहिल्यावर? त्याचे बहुतेक मार्क त्याच्या निष्काळजीपणामुळे, धांदरटपणामुळे जातात. वरती म्हणतो कसा– बघ एवढं मी लिहून इतकेच मार्क मिळाले, मग मी सारखा अभ्यास करून काय फायदा? एरवी सगळ्या गोष्टींची माहिती असते. आता मायकेल जॅक्सन मुंबईत यायचा आहे– ते विचारा. तो कुठे राहणार आहे, कुठे कुठे कार्यक्रम करणार आहे– सगळं सांगेल तुम्हाला. पण शिवाजीमहाराजांचा राज्याभिषेक किती साली झाला विचारलत तर म्हणेल काय करायच्या आहेत त्या होऊन गेलेल्या गोष्टी? सध्या त्याने आणखी एक खूळ डोक्यात घेतलंय– कॉम्प्युटर गेम्सचं. सारखा त्याच्या वडिलांच्या मागे लागतो की मला नवीन गेम्स द्या म्हणून. असलेले सगळे गेम्स झाले खेळून, आता कंटाळा आला म्हणतो.''

'त्याचा इतर दिनक्रम काय असतो? म्हणजे, शाळेव्यतिरिक्त?'

''कसला दिनक्रम? नुसता इकडेतिकडे करत असतो. नाहीतर चक्क म्हाताऱ्यासारखा पायावर पाय ठेवून उताणा पडून राहतो– काही न करता. विचारलं की म्हणतो मला कंटाळा आला. अभ्यासाचं नाव

काढलं तर मग बघायलाच नको. मध्ये मी त्याला म्हटलं शिकवणीला जा– तेवढा तरी अभ्यास होईल, तर त्याने रागारागाने दोन पुस्तकं फाडली– आता सांगा– नकोय का त्याला औषध द्यायला?''

केतनला बघितल्यावरच कुणीही चटकन सांगितलं असतं– हा मुलगा बुद्धिमान आहे. त्याच्या डोळ्यातून, बोलण्यातून त्याच्या बुद्धीची धार स्पष्ट जाणवत होती.

''डॉक्टरकाका, तुमच्या टेबलावर हे काय आहे?''

'हे मेंदूचं मॉडेल.'

''म्हणजे ब्रेन? आपला ब्रेन कॉम्प्युटरसारखाच असतो ना? मला कॉम्प्युटर खूप आवडतो.''

'तुला आणखी काय आवडतं?'

''मला रोजचा पेपर वाचायला आवडतो.''

'तू वाचतोस रोज?'

''हो. पण आई पेपर लपवून ठेवते. अभ्यास केलास तरच पेपर वाचायला देईन असं म्हणते.''

केतनशी सविस्तर बोलल्यावर या गोष्टीची पक्की खात्री झाली की त्याचा बुद्ध्यांक हा सरासरीपेक्षा निश्चितच जास्त होता. दुर्दैवाने त्याच्या बुद्धीला चालना देणारं असं त्याच्या शालेय अभ्यासक्रमात किंवा त्याच्या घरच्या वातावरणात काहीही नव्हतं. त्याला त्याच त्याच यांत्रिक पद्धतीने अभ्यास करून, येत असलेलंच पुन्हा पुन्हा वाचून-लिहून कंटाळा न आला तरच नवल. विषयातलं नावीन्य संपलं की त्यातला रस संपणं आणि तो चंचल होणं अगदी स्वाभाविक होतं. त्याचा बुद्ध्यांक उत्तम आहे हे त्याच्या आईला कसं पटवावं? डॉक्टरांनी तोंडी सांगण्यापेक्षा लेखी रिपोर्टवर केतनच्या आईचा विश्वास बसण्याची शक्यता जास्त होती. तोच सल्ला त्यांना दिला.

दोन दिवसांनी रिपोर्ट आला. बुद्ध्यांक एकशेअठ्ठेचाळीस! सर्वसामान्य बुद्ध्यांक नव्वद ते एकशेदहा एवढा असतो. म्हणजे केतनची बुद्धिमत्ता असामान्य दर्जाची होती. त्या बुद्धीला भरपूर खाद्य सतत मिळत राहिलं तर ती टवटवीत राहील. त्या बुद्धीला आव्हान देणाऱ्या अनेक गोष्टींची योजना त्याच्या पालकांनी त्याच्यासाठी करायला हवी आहे. फक्त पाठांतर किंवा स्मरणशक्ती तपासणाऱ्या परीक्षांवरून त्याचा कस ठरवणं, इतर मुलांशी त्याची तुलना करणं हा त्याच्यावर अन्याय आहे. त्याचा खरा कस लागेल स्पर्धात्मक परीक्षांमध्ये. वेगवेगळ्या तऱ्हेची कोडी, बुद्धिबळासारखे खेळ, विचारांना चालना देणारी पुस्तकं, त्याच्या आवडीचे छंद अशा गोष्टींनी त्याचा दिनक्रम भरलेला असायला हवा. शाळकरी जगापलीकडच्या, खिडकीबाहेरच्या जगाची त्याला ओळख व्हायला हवी. त्यासाठी ज्ञानार्जनाच्या सर्व वाटा त्याला खुल्या

करून द्यायला हव्यात. त्याच्या मनात उभ्या राहणाऱ्या सगळ्या शंकांचं समाधान करून घेण्याचा हक्क त्याला पुरेपूर द्यायला हवा, तर त्याला परिपूर्ण वाटेल आणि त्याच्या वर्तनात बदल घडेल.

तात्पर्य– कुठल्या तरी लेखावरून आपल्या मुलात ती सगळी लक्षणं शोधणं ही सुशिक्षितांची रीत बरी नव्हे. (आताचा लेखही त्याला अपवाद नाही.)

**आपलं महानगर, दि.२३ सप्टेंबर १९९६**
**काही बोलायाचे आहे**